आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

e Paper

वर्ष 4 थे

www.metrocityvrutant.in

शनिवार दिनांक 02/05/2026

METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 115 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# मिसिंग लिंक प्रकल्पातील बोगद्याचा जगातील सर्वाधिक रुंद बोगदा म्हणून विक्रम

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : महाराष्ट्र दिनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन होऊन प्रवाशांच्या सेवेत दाखल झालेल्या यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गावरील मिसिंग लिंक प्रकल्पातील बोगद्याची जगातील सर्वाधिक रुंद भूमिगत बोगदा म्हणून गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे. गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डच्या प्रतिनिधींनी याबाबतच्या जागतिक विक्रमाचे प्रमाणपत्र मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केले.**



यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले, महिला व बालविकास मंत्री कु. आदिती तटकरे, सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, खासदार श्रीरंग बारणे, सुनील तटकरे, आमदार उमा खापरे, सुनील शेळके, गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर पाटणकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, एमएसआरडीसीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक अनिल गायकवाड, एमएसआरडीसीचे अधिकारी तसेच या प्रकल्पांतर्गत बोगद्याच्या बांधकामातील सहभागी नवयुगा कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

याप्रसंगी गिनिज बुक ऑफ वर्ड रेकॉर्डने या बोगद्याची रुंदी जगात सर्वाधिक 22.33 मीटर अशी जाहीर केली. तत्पूर्वी एमएसआरडीसीचे अधिकारी आणि नवयुगाच्या प्रतिनिधींनी मुख्यमंत्री आणि उपस्थित मान्यवरांना या बोगद्याच्या कामाबाबतची तांत्रिक माहिती दिली.

# राज्यपालांच्या स्व-गणनेने राज्यातील जनगणनेचा आरंभ

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केलेल्या स्व-गणनेने देशातील पहिल्या डिजिटल जनगणनेचा 'जनगणना 2027' चा महाराष्ट्रातील औपचारिक आरंभ लोकभवन मुंबई येथे करण्यात आला.**



महाराष्ट्र स्थापना दिनी जनगणना सुरू होत असल्याबद्दल आनंद व्यक्त करताना राज्यपालांनी राज्यातील जनतेला जनगणनेच्या राष्ट्रीय उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले.

ही स्व-गणना दिनांक 1 ते 15 मे या कालावधीत होणार असून त्यानंतर जनगणना कर्मचारी घरोघरी जाणार आहेत. ही स्व-गणना प्रत्येक नागरिकाला स्वतःला करायची असून त्यामध्ये 33 प्रश्नाची उत्तरे द्यायची आहेत. अवघ्या दहा मिनिटात स्व-गणना करता येते असे सांगून राज्यातील 2.6 लाख कर्मचारी जनगणना करणार असल्याची माहिती महाराष्ट्राच्या प्रधान जनगणना अधिकारी डॉ. (श्रीमती) निरुपमा जे. डांगे यांनी दिली.

यावेळी राज्यपालांच्या पत्नी सुधा देव वर्मा, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. विपिन शर्मा, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, उप महानिबंधक ए. एन. राजीव, उप महानिबंधक यशवंत पाटील प्रामुख्याने उपस्थित होते.

# महापौर रवि लांडगे यांचा स्वगणनेतून जनगणना २०२७ मोहिमेला शुभारंभ

## नागरिकांना सहभागाचे आवाहन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : जनगणना 2027 या महत्त्वाच्या राष्ट्रीय उपक्रमाची महाराष्ट्रात आजपासून सुरुवात झाली असून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे महापौर रवि लांडगे यांनी स्वतः ऑनलाइन स्वगणना पूर्ण करून या मोहिमेचा प्रारंभ केला. नागरिकांनीही पुढाकार घेत या प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले आहे. महापौर रवि लांडगे यांनी https://se.census.gov.in या संकेतस्थळावर भेट देत आवश्यक माहिती भरून स्वगणना प्रक्रिया पूर्ण केली. सर्व 34 प्रश्नांची अचूक माहिती देत



त्यांनी नोंदणी केली आणि 'सेल्फ एन्युमरेशन आयडी' प्राप्त केला. त्यांच्या या कृतीमुळे नागरिकांमध्ये सकारात्मक संदेश पोहोचला आहे.यावेळी महापौर रवि लांडगे म्हणाले, जनगणना ही देशाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यावश्यक आहे. अचूक माहितीमुळे शासनाला योग्य नियोजन करता येते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने या उपक्रमात सहभागी व्हावे. 1 मे ते 15 मे 2027 या कालावधीत स्वगणना सुविधा उपलब्ध असून नागरिकांना घरबसल्या ही प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे.याशिवाय, 16 मे ते 14 जून दरम्यान प्रगणकांमार्फत घरोघरी भेट देऊन उर्वरित जनगणना प्रक्रिया पार पडणार आहे. तरी अधिकाधिक नागरिकांनी स्वगणना करून सहकार्य करावे, असे आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केले आहे.

# मावळात दुर्दैवी जलसमाधी जाधववाडी धरण व पवना नदीत बुडून ४ तरुणांचा मृत्यू


दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**तळेगाव दाभाडे/मावळ : मावळ तालुक्यात कामगार दिनाच्या सुट्टीत फिरण्यासाठी गेलेल्या तरुणांवर काळाने घाला घातला असून, दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये एकूण चार जणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे. जाधववाडी धरण (नवलाख उंबरे) येथे तिघांचा तर साळुंब्रे येथील पवना नदीत एका तरुणाचा मृत्यू झाल्याने परिसरात शोककळा पसरली आहे.**

जाधववाडी धरण परिसरात फिरण्यासाठी आलेल्या काही पर्यटकांनी उष्णतेपासून दिलासा मिळवण्यासाठी पाण्यात उतरण्याचा निर्णय घेतला. मात्र, पाण्याची खोली व प्रवाहाचा अचूक अंदाज न आल्याने पाच जण अचानक बुडू लागले. यामध्ये अजय गाऊडे, संतोष एडके आणि अनिकेत पवार या तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाला. स्थानिक ग्रामस्थांनी धाडस दाखवत दोघांना सुखरूप बाहेर काढले, मात्र उर्वरित तिघांना वाचवता आले नाही.

घटनेची माहिती मिळताच स्थानिक रेस्क्यू पथक घटनास्थळी दाखल झाले.

### कामगार दिनी सहलीचा आनंद ठरला जीवघेणा रेस्क्यू पथकांचे अथक प्रयत्न निष्फळ



बुडालेल्या तरुणांना बाहेर काढून तत्काळ सीपीआर देण्यात आला, मात्र वेळ निघून गेल्याने त्यांना जीवदान देता आले नाही.

दुसरी घटना साळुंब्रे येथील जुन्या दगडी पुलाजवळ घडली. मनोज भारत गौतम (वय 25, मूळ रा. उत्तर प्रदेश) हा तरुण सकाळी सुमारे 8 वाजण्याच्या सुमारास नदीत पोहण्यासाठी उतरला होता. पाण्याची खोली न समजल्याने तो बुडाला. मनोज हा स्थानिक काळोखे पाईप लाईन कंपनीत कार्यरत होता. या घटनेने सहकाऱ्यांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

घटनेनंतर वन्यजीव रक्षक मावळ संस्था, शिवदुर्ग मित्र लोणावळा आणि NDRF च्या पथकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत संयुक्त बचावमोहीम राबवली. अथक प्रयत्नांनंतर सर्व मृतदेह बाहेर काढण्यात आले.

जाधववाडी येथील मृतदेह 'विरा ॲम्बुलन्स'द्वारे तळेगाव दाभाडे येथील जनरल हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले, तर साळुंब्रे येथील मृतदेह पवना हॉस्पिटलमध्ये पुढील प्रक्रियेसाठी दाखल करण्यात आला.

या मोहिमेत निलेश गराडे, अनिल आंद्रे, भास्कर माळी, विनय सावंत, कमल परदेशी, शुभम काकडे, विकास दोड्डी, भारत मेहेंदळे, कमलेश राक्षे, सर्जेस पाटील, विकी दौंडकर, अविनाश कार्ले, रवी कोळी, कुंदन भोसले, हर्षद काळोखे, राजू सय्यद, करण भांगरे तसेच 'विरा ॲम्बुलन्स'च्या टीमने मोलाची भूमिका बजावली.

उन्हाळ्यात धरण, तलाव आणि नदी परिसरात पर्यटनासाठी येणाऱ्या नागरिकांनी अत्यंत सावधगिरी बाळगावी, पाण्याची खोली व प्रवाहाची माहिती घ्यावी, तसेच सुरक्षितता साधनांशिवाय पाण्यात उतरू नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शनिवार दिनांक 02/05/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# “10 दिवसांत दुप्पट परतावा” चे आमिष; निगडीत 22.50 लाखांची फसवणूक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड शहरात गुंतवणुकीवर अल्पावधीत दुप्पट परतावा देण्याचे आमिष दाखवून एका महिलेला तब्बल 22 लाख 50 हजार रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी निगडी पोलिसांनी आरोपीला अटक केली असून, त्याच्याविरोधात गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




निगडी पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या गुन्ह्यानुसार, ही घटना 6 फेब्रुवारी 2026 ते 7 एप्रिल 2026 या कालावधीत सेक्टर क्रमांक 26, प्राधिकरण निगडी येथील आयकर कर्मचारी निवास परिसरात घडली. याप्रकरणी 30 एप्रिल रोजी सायंकाळी 7.33 वाजता गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी कुणाल काशिनाथ साबळे (वय 36, रा. जुनी सांगवी, पुणे) याने स्वतःच्या व कुटुंबीयांच्या नावावर तीन कंपन्या असल्याचे भासवून फिर्यादी महिलेला बनावट कागदपत्रे दाखवली. त्याने “गुंतवणूक केल्यास केवळ 10 दिवसांत दुप्पट रक्कम परत मिळेल” असे आमिष दाखवून विश्वास संपादन केला.

आरोपीच्या बोलण्यावर विश्वास ठेवून फिर्यादीने वेळोवेळी त्याच्या बँक खात्यात एकूण 22 लाख 50 हजार रुपये ट्रान्सफर केले. यानंतर आरोपीने विश्वास वाढवण्यासाठी 25 लाख रुपयांचा धनादेशही दिला होता. मात्र, ठरलेल्या मुदतीनंतर रक्कम परत न मिळाल्याने फिर्यादीने संबंधित धनादेश बँकेत जमा केला असता, खात्यात पुरेशी शिल्लक नसल्याने तो धनादेश बाऊन्स झाला.

यानंतर फसवणूक झाल्याचे लक्षात येताच फिर्यादीने निगडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपीला अटक केली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शिर्के करत असून, अशा प्रकारच्या गुंतवणूक योजनांपासून सावध राहण्याचे आवाहन पोलिसांनी नागरिकांना केले आहे.

# महानगरपालिकेच्या सेवेतून 30 अधिकारी-कर्मचारी सेवानिवृत्त

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सेवेतून सेवानिवृत्त होणा-या अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यरत असताना प्रामाणिकपणा व निष्ठेने दिलेल्या सेवा व योगदानामळे संस्थेची भक्कम पायाभरणी झाली असे प्रतिपादन उपमहापौर शर्मिला बाबर यांनी केले व त्यांचेप्रती कृतज्ञता व्यक्त केली.**



महानगरपालिकेच्या वतीने आयोजित सन्मान समारंभात माहे एप्रिल 2026 अखेर नियत वयोमानानुसार तसेच स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत मधुकर पवळे सभागृहात उपमहापौर शर्मिला बाबर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला त्यावेळी त्या बोलत होत्या.

या कार्यक्रमास सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, नगरसेवक कुशाग्र कदम, उत्तम केंदळे, सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह विविध विभागांतील अधिकारी-कर्मचारी तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे नातेवाईक उपस्थित होते.

उपमहापौर शर्मिला बाबर म्हणाल्या, 'आज सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी, कर्मचारी यांनी महापालिकेत उत्कृष्ट सेवा बजावत आपली जबाबदारी पार पाडली आहे. सेवानिवृत्तीनंतर या अधिकारी-कर्मचाऱ्यांना कुटुंबीयांनी सन्मानपूर्वक वागणूक द्यावी. तसेच सेवानिवृत्तीनंतरचा काळ हा नव्या संधींचा असल्याने समाजकार्यात सक्रिय सहभाग घेऊन आनंदी व समाधानकारक आयुष्य जगावे, असे देखील त्या म्हणाल्या.

“सेवानिवृत्ती ही केवळ कागदावर असते, मनाची नसते” या भावनेतून सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आजवर जपलेली लोकसेवा आणि कर्तव्यनिष्ठा यापुढेही सुरू ठेवावी,शहराच्या विकास प्रक्रियेत मार्गदर्शक म्हणून सहभाग नोंदवावा आणि आपल्या अनुभवाचा लाभ नव्या पिढीला करून द्यावा असे सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे म्हणाले.

एप्रिल 2026 मध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्यांमध्ये कार्यकारी अभियंता सुनील वाघमारे, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ.राजेंद्र फिरके, मुख्याध्यापक (प्राथमिक शिक्षण) जयमाला गावडे, चंदा काकडे, सिस्टर इन्चार्ज रोहिणी काकडे, मुख्य लिपिक प्रकाश बाणेकर, राजकुमार यादव, मुरगू बोटे, माया गिते, उपशिक्षक सुनिता इंगळे, फार्मासिस्ट मिलिंद पंडित, सांख्यिकी सहाय्यक प्रशांत उमराणी, वाहन चालक विलास ढोरे, रखवालदार गुलाब हिले, शिपाई विजय कदम, मजूर राजू कुटे, सुरेश देवकर, भिमाजी देवकर, सफाई कामगार पुष्पा ओव्हाळ, रामलिंग गायकवाड यांचा समावेश आहे.

तर स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या कर्मचाऱ्यांत कार्यकारी अभियंता राजेंद्र मोराणकर, स्टाफनर्स मंगल डफळ, मुकादम सुनील माने, प्रविण डोळस, सफाई कामगार शाम मासरे, कांता शितोळे, मच्छिंद्र सोनवणे, सफाई सेवक महंमद कादर, तुकाराम गोफणे, दीपक उबाळे यांचा समावेश आहे.या सन्मान सोहळ्यात सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला असून त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमोद जगताप यांनी तर सूत्रसंचालन आणि आभार प्रफुल्ल पुराणिक यांनी मानले.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शनिवार दिनांक 02/05/2026

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# संभाजी बारणे यांची 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड'मध्ये नोंद

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**थेरगाव : साहित्य, सांस्कृतिक क्षेत्रा बरोबरच विविध क्षेत्रात मुशाफिरी करणारे थेरगाव चे जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते संभाजी बाळासाहेब बारणे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन चरित्रावर विविध लेखकांनी लिहिलेल्या, 9 भाषेतील 551 पुस्तकांचा संग्रह जमा केला आहे.**




यामध्ये मराठी, हिंदी, इंग्रजी, संस्कृत, कन्नड, तमिळ, तेलगू, गुजराती आणि सिंधी भाषेतील पुस्तकांचा समावेश आहे. संभाजी बारणे यांच्या या पुस्तक संग्रहाची "इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड" मध्ये यथोचित नोंद करण्यात आली आहे. तसे प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह नुकतेच बारणे यांना इंडिया बुक ऑफ रेकॉर्डच्या समितीच्या वतीने 25 मार्च 2026 रोजी प्रदान करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित अशा प्रकारचा पुस्तक संग्रह करणारे संभाजी बारणे हे एकमेव आहेत असा दावा गुरुवारी पिंपरी येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी केला आहे.

यावेळी आण्णासाहेब मगर सांस्कृतिक फाऊंडेशनचे अध्यक्ष गोविंद खामकर, गीतकार बाळासाहेब भालेराव आदी यावेळी उपस्थित होते.

बारणे यांच्या विक्रमाची नोंद राष्ट्रीय पातळीवर घेण्यात आल्यामुळे सर्व शिवप्रेमी मध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. संभाजी बारणे हे पिंपरी चिंचवड शहरातील थेरगाव येथील उच्चशिक्षित रहिवाशी असून शेती व बांधकाम व्यवसाय करतात. त्यांच्याकडे छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेगवेगळ्या धातूंमधील विविध आकारांच्या 70 पेक्षा जास्त मूर्ती देखील आहेत. केंद्र सरकारने छत्रपती शिवाजी महाराजांवर काढलेल्या दोन रुपयांच्या दीड हजार नाण्यांचा संग्रह देखील त्यांनी केला आहे. ही पुस्तके आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्ती, नाणी नागरिकांना पाहण्यासाठी त्यांच्या थेरगाव येथील कार्यालयात रोज सकाळी दहा ते सायंकाळी सहा या वेळेत उपलब्ध आहेत. थेरगाव गावठाण येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा अर्ध पुतळा लोक वर्गणीतून उभारण्यासाठी मी पुढाकार घेतला होता. छत्रपती शिवाजी महाराजांवर संशोधन करणाऱ्या व्यक्तींना ही पुस्तके वाचण्यासाठी व संदर्भ साठी मोफत उपलब्ध करून देत असल्याचेही संभाजी बारणे यांनी सांगितले.

शिक्षण, कला, क्रीडा, सांस्कृतिक, आरोग्य, पर्यावरण, राजकारण साहित्य अशा विविध क्षेत्रात सक्रिय असणारे बारणे यांनी यापूर्वी पिंपरी चिंचवड शहरातील 1978 सालापासून 2022 पर्यंतच्या आजी-माजी नगरसेवकांच्या 1200 व्हिजिटिंग कार्डचा संग्रह केला आहे. त्याची नोंद देखील इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये 2019 मध्ये घेण्यात आली आहे. महानगरपालिकेत वृक्ष प्राधिकरण समितीवर सदस्य म्हणून काम केले आहे. तसेच अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेचे ते आजीव सभासद आहेत. त्यांनी संपादन केलेल्या "पिंपरी चिंचवड वैभव" या कविता संग्रहाचे ज्येष्ठ सिने अभिनेत्री वर्षा उसगावकर यांच्या हस्ते नुकतेच प्रकाशन करण्यात आले आहे अशी माहिती यावेळी गोविंद खामकर यांनी दिली.

# प्रभाग 16 मध्ये धोकादायक ठिकाणी गतिरोधकांची मागणी

## नगरसेविका रेश्मा कातळे यांचे प्रशासनाला निर्देश

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**प्रभाग क्रमांक 16 मधील रावेत भागातील रस्ते अपघातप्रवण ठरत असून, तेथे तात्काळ सुरक्षा उपाययोजना करण्याची गरज अधोरेखित होत आहे. काही दिवसांपूर्वी झालेल्या अपघातात रविंद्र लातुरे यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्यानंतर या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष वेधण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर नगरसेविका रेश्मा ताई कातळे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या आहेत.**



नगरसेविका कातळे यांनी सांगितले की, नागरिकांची सुरक्षितता ही प्रशासनाची प्राधान्याची बाब असली पाहिजे. धोकादायक ठिकाणांची पाहणी करून तेथे गतिरोधक (स्पीड ब्रेकर) बसविणे, वेगमर्यादा दर्शविणारे फलक लावणे, तसेच इतर आवश्यक सुरक्षा उपाययोजना तातडीने राबविणे गरजेचे आहे.

प्रभागातील काही भागांमध्ये वेगाने वाहने चालवली जात असल्याने अपघाताचा धोका वाढत असल्याचे स्थानिक नागरिकांनीही निदर्शनास आणून दिले आहे. विशेषतः सोसायटी समोरील रस्ता, शाळा परिसर, रावेत आणि किवळे मधील भाग आणि चौकांमध्ये सुरक्षा उपाययोजना करण्याची आवश्यकता व्यक्त होत आहे.

याबाबत नगरसेविका कातळे यांनी अधिकाऱ्यांना लवकरात लवकर प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक त्या उपाययोजना सुरू करण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच येणाऱ्या पावसाळ्यापूर्वी ही कामे पूर्ण व्हावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

दरम्यान, स्थानिक नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत करत प्रशासनाने तातडीने कार्यवाही करून सुरक्षिततेची हमी द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968